**नि.फौ.ख.क्र. ९४/२०२५**
**सरकार वि. अमोल मोरे**
**निशाणी क्र.४७**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ५ यांचे सत्यप्रतिज्ञेवर कथन.**

माझे नाव –प्रविण दत्तात्रय बनकर,
माझे वय – ३८ वर्षे, व्यवसाय – शेती
राहणार – वाजेगाव, ता.फलटण, जि.सातारा

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधीज्ञ श्रीमती एस.एन.वायकर यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

दि.१६.१२.२०२३ रोजी मी रानामध्ये होतो. त्या दिवशी काय घडले होते हे मला माहित नाही. मी आरोपींना ओळखत नाही. मला त्यांचे नाव माहित नाही. आरोपी व माझ्यामध्ये नोटरीचा कोणताही व्यवहार झालेला नाही. मी अतुल रासकर यांना ओळखत नाही. अतुल रासकर यांनी आरोपीविरुद्ध केस केल्याचे मला माहित नाही. सदर केसबाबत पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली नाही.

**(साक्षीदार पुर्वीच्या कथनांशी विसंगत जबाब देत असल्याने त्याचे उलट तपासणीची परवानगी सरकारी वकीलांनी मागितली. परवानगी मंजुर)**

हे म्हणणे खरे नाही की, दि.१६.१२.२०२३ रोजी मी जेसीबी क्र.एम.एच.२०–ए.वाय.६२८५ हा घेवून पिंप्रद वडले या रस्त्याने जात होतो व तेथे पोलिस आले, त्यांनी मला सांगितले की, सदरचा जेसीबी हा चोरीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळी पोलिसांना सांगितले की, दि.१५.१२.२०२३ रोजी सदरचा जेसीबी मी अमोल मोरे यांच्याकडून करार करुन र.रु.४,००,०००/– ला विकत घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अमोल मोरे यांना २,२०,०००/– रुपये रोख दिले व १,८०,०००/– रुपयेचा आय.आय.सी.आय. बँकेचा धनादेश दिला होता. त्याबाबत मी कोणतीही नोटरी करुन घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी सदरचा जेसीबी हा माझ्या ताब्यातुन घेवून लोणंद पोलिस स्टेशनला नेला व त्यानंतर मी चौकशीकामी पोलिस स्टेशनला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की,त्यावेळी मला पोलिसांकडून समजले की, सन २०१९ मध्ये अमोल मोरे याने अमोल कोळेकर याला

सदर जेसीबी विकलेला होता व सदरचा जेसीबी पुन्हा अतुल रासकर यांना अमोल मोरे याने दि.०३.०७.२०२३ ला विकला. मला माहित नाही की, जेसीबी चोरीबाबत अतुल रासकर याने चोरीची फिर्याद दिली होती किंवा कसे व सदर फिर्यादीच्या तपासात पोलिसांनी जेसीबी हा माझ्या ताब्यातुन जप्त केला होता. मला माहित नाही की, जेसीबी मला नोटरीवर दिला तेव्हा त्यावर श्रीराम फायनान्सचे कर्ज होते किंवा काय. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित मजकूर अ वाचून दाखवण्यात आला. सदरचा मजकूर माझ्या जबाबात का आहे याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला माझ्या व्यवहाराचे पैसे परत मिळाले आहेत व त्यामुळे मी आरोपीला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.पी.पी.जाधव यांचेमार्फत नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए.एस.साटोटे)

ता.१२.११.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण.

(न्यायालय क्र.३)